भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ४३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०६/२०१७

**१) शाळेच्या कार्यालयाचे समोरील दाराचा ताला तोडुन टिव्ही,मॉनीटर व सिपीयु चोरून नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३/०६/२०१७ ते ११.०० ते ५/०६/२०१७ चे ०७/३० वा. दरम्यान यातील व् पुर्व माध्यमिक शाळा हरदोली झंझाळ येथिल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन शाळेच्या वऱ्हांडयाचे गेटचे व मुख्याध्यापकाच्या कार्यालयाचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून त्यातील दोन एलईडी टिव्ही, २ मॉनीटर, १ सिपीयु असा एकुण ६०,०००/रू. माल चोरून नेल्याने फिर्यादी चरण दास जगन खंडाते मुख्याध्यापक जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक शाळा हरदोली झंझाळ यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. निरगुडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) लाच रक्कम स्किारतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०६/२०१७ चे १६.१० ते २०.५० वा. दरम्यान यातील आरोपीने तक्रारदार संजय राजाराम गायधने वय ४४ वर्ष, रा. दाभा कोथुर्णा धंदा – ट्रक मालक व त्याचे कडील एकुण ७ वाहने रोडवर वाहतुक करण्याकरिता त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करण्याकरीता तसेच मागील मे महिण्याची मंथली म्हणुन प्रती ट्रक १०००/–रु. प्रमाणे एकुण ७ ट्रक मागणी करुन खाजगी ईसमामार्फत लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवीली तसेच नमुद आरोपी हे वारंवार गुन्हा करण्याचे सवईचे असुन भष्ट्र आहे. आरोपीचे कृतयावरील कलमान्वये होत असल्याने पोस्टे मोहाडी पो.स्टे मोहाडी येथे कलम ७,१३(१)अ सहकलम १३ (२) ला. प्र. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पुल्लरवार पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मुलीवर जबरीने अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ४/०६/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान यातील पिडीत फिर्यादी शौचास करण्याकरिता गेली असता यातील अनोळखी आरोपीने फिर्यादीचे तोंड दाबुन ओढत शेनखताचे खंडयामध्ये नेवुन जबरीने शारीरीक अत्याचार केल्याने पिडीताच्या बयानावरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७६ (१) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करून विवाहीतेला पैशासाठी शारीरीक व मानसिक त्रास देवुन मारपीट केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०५/२०१७ चे २१.०० ते ५/०६/२०१७ चे आज पावोतो यातील पाचही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीला आपले माहेरून ५०,०००/रू. आण असे मानसिक व शारीरीक त्रास देवुन फिर्यादीला चार दिवस रूम मध्ये डांबुन ठेवुन तीला मारपीट केल्याने व महिला सेल तुमसर यांचे पत्रावरून व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. गोबरवाही येथे कलम ४९८,(अ),३४३,३२३,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**५) बॅंकेचा पैश्याच्या व्यवहारात विश्वासघात केल्याने गुन्हा नोंद . :–**

**अ)** ऑगस्ट २०१६ ते आज पावेतो यातील आरोपीने आपले विश्वास आग्रो इंडस्ट्रीज प्रो राईसमीलींग प्रोसेसींग व धान खरेदी विक्री मिल पाहुणी चे देना बॅंक भंडारा मधील कर्जाचे ३ करोड उचल करुन विक्री केलेल्या धानाचे पैसे बॅंकेत न भरता सदर पैसे स्वता:हा वापरुन बॅंकेचे व्यवहारात अनियमितता करुन दिनांक १/०८/२०१६ पासुन बॅंकेचा व्यवहार बंद केले व अन्यायाने विश्वासघात करुन फसवणुक केल्याने फिर्यादी अशोक गोविंदराव निमजे वय ४९ वर्ष, रा देना बॅंक शाखा अधिकारी भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोस्टे. वरठी येथे कलम ४०६,४०९,४२० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. काळबांधे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**ब)** ऑगस्ट २०१६ ते आज पावेतो यातील आरोपीने आपले श्रध्दा राईस मिल प्रोसेसींग पाऊणीचे देना बॅंक क्रेडीट लिमीट हातामध्ये कर्जाचे ४ करोड रुपयाची उचल करुन धानाचे पैसे बॅंकेत न भरता सदर पैसे स्वताहा वापरुन बॅंकेचे व्यवहारात अनियमितता करुन दिनांक १/०८/२०१६ पासुन बॅंकेचा व्यवहार बंद केले व अन्यायाने विश्वासघात करुन फसवणुक केल्याने फिर्यादी अशोक गोविंदराव निमजे वय ४९ वर्ष, रा देना बॅंक शाखा अधिकारी भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोस्टे. वरठी येथे कलम ४०६,४०९,४२० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. काळबांधे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**६) उपोषणाला बसला म्हणुन लांकडी दांडा पकडुन जखमी डोक्यावर जिव घेण्याचे उद्‌देशाने मारुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०५/०६/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादी सुनील बकाराम चाफले वय ३२ वर्ष, रा. मुरमाडी/ तुपकर हा आपले सोबती रवीद्र मेश्राम रा. नानोरी यांचे सोबत तहसिल कार्यलया समोर बसला असतांना त्यास पाहुण जिवे मारण्याचा उद्‌देशाने समोर जावुन हातात लाकडी दांडा घेवुन फिर्यादी जवळ येवुन 'तु माझ्या विरोधात उपोषणाला बसला' म्हणुन मला सस्पेन्ट केले तुझ्यामुळे माझी बदनामी झाली व मुले रस्त्यावर आले. असे म्हणुन हातातील लाकडी दांडा जखमीचे डोक्यावर जिवे घेण्याचे उद्‌देशाने मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोस्टे. लाखनी येथे कलम ३०७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चकाटे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

PSI

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.